# सुरक्षित इंटरनेटसाठी 'एयूसीएल'चा पुढाकार

**मुंबई :** तरुणांची सायबर फसवणूक आणि ऑनलाईन शोषणाच्या वाढत्या समस्यांवर मात करण्यासाठी प्रमुख धोरण सल्लागार संस्था एयू कॉर्पोरेट अॅडव्हायजरी अँड लीगल सर्व्हिसेस (एयूसीएल) ने WHT NOW या डिजिटल सुरक्षिततेसाठी कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थेसोबत भागीदारी केली आहे. आज मुंबईत एयूसीएल, WHT NOW आणि आदित्य ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या सहकार्याने एका विशेष पॅनेल चर्चेचे आयोजन केले. पॅनेलमध्ये एयू कॉर्पोरेट अँड लीगल अॅडव्हायजरी सर्व्हिसेस लिमिटेड (एयूसीएल) चे संस्थापक अक्षत खेतान, WHT NOW च्या संस्थापिका निती गोयल, डॉ. निवेदिता श्रेयन्स, तसेच मोहिमेचे ब्रँड अॅम्बेसिडर अभिनेता ताहा शाह बदुशा यांचा समावेश होता.